१९५५ पासून निर्भिड लिखाण करणारे व महिलेने चालविलेले स्वतंत्र दैनिक

# लोकशाही

लोक LIVE तुमच्या मनातलं...! www.lokshahilive.com

Download Our Apps · www.lokshahilive.com

इंटरनेट आवृत्ती - www.lokshahilive.com, https://www.facebook.com/lokshahilive/

जळगाव, मंगळवार, दि.४ नोव्हेंबर २०२५ | RNI NO.MAHMAR/2009/33028, REG.NO.JAL/16/2024-26 | • अंक -३५३ • पाने ६ • किंमत ३ रु.



**दै. लोकशाहीच्या 'लोकारोग्य'** विशेषांकाचे प्रकाशन करतांना महामंडलेश्वर जनार्दन हरिजी महाराज सोबत खासदार स्मिता वाघ, आमदार राजूमामा भोळे, भाजपाच्या जिल्हा सरचिटणीस डॉ. केतकी पाटील, डॉ. अमित भंगाळे, जिल्हा माहिती अधिकारी रवींद्र ठाकूर, लोकशाहीचे संचालक राजेश यावलकर, शुभांगी यावलकर, सल्लागार संपादक धों.ज.गुरव, वरिष्ठ उपसंपादक दीपक कुलकर्णी, सुरेश सानप, ज्येष्ठ साहित्यीक आर.डी. कोळी, गोविंद पाटील, निंबा बडगुजर.

### सोने-चांदी

- **सोने** (प्रति १० ग्रॅम) : १,२१,७००
- **चांदी** (प्रति १ किलो): १,५४,०००

### तापमान

- **कमाल** : ३२ अंश सेल्सिअस
- **किमान** : २१ अंश सेल्सिअस

### महत्वाचे

## जिल्ह्यात गोळीबार तरुण गंभीर जखमी

**जळगाव :** जिल्ह्यातील गोळीबाराच्या घटना सलग सुरूच असून, दुसऱ्या दिवशी पुन्हा एका तरुणावर जीवघेणा हल्ला झाल्याची खळबळजनक घटना एरंडोल तालुक्यातील कढोली गावात घडली आहे. गोळी लागलेल्या तरुणावर जळगाव शहरातील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असून, पोलिसांकडून या प्रकरणाचा तपास सुरू आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कढोली गावातील ३१ वर्षीय तरुण हा एका खाजगी कंपनीत नोकरी करतो. उद्या पारोळा येथे होणाऱ्या रथोत्सवासाठी तो आई-वडिलांसह गावी जाण्याच्या तयारीत होता. मात्र, आज दि. ३ नोव्हेंबर रोजी दुपारी सुमारे ४ वाजेच्या सुमारास घराच्या मागील बाजूस उभा असताना अचानक एक गोळी येऊन त्याच्या छातीत घुसली. रक्तस्त्राव सुरू झाल्याने कुटुंबीयांनी तातडीने त्याला जळगाव येथील खाजगी रुग्णालयात दाखल केले. घटनेनंतर गावात मोठी खळबळ उडाली असून, पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, हा गोळीबार पाळधी परिसरातील एका हॉटेलमध्ये घडल्याची प्राथमिक माहिती आहे. तसेच गोळीबार करणारे व्यक्ती जखमीच्या परिचयातील असल्याचीही चर्चा आहे.

## गरीब वीजग्राहकांना पंचवीस वर्षे मोफत वीज

**जळगाव –** दारिद्र्य रेषेखालील आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या घरांवर एक किलोवॅट क्षमतेचा सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसवून त्यांना २५ वर्षे मोफत विजेची सुविधा उपलब्ध करण्यासाठीच्या स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफ टॉप (स्मार्ट) योजनेच्या अंमलबजावणीसाठी महावितरणने पुढाकार घेतला आहे. केंद्र सरकार व राज्य सरकारच्या अनुदानामुळे या योजनेतील लाभार्थी ग्राहकांना खूप कमी हिस्सा भरावा लागणार आहे, असे महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा. लोकेश चंद्र यांनी सांगितले.

# शारिरीक, मानसिक स्वास्थ जीवनाची गुरुकिल्ली!

### महामंडलेश्वर जनार्दन हरिजी महाराज यांचे प्रतिपादन : लोकशाहीच्या 'लोकारोग्य' विशेषांकाचे प्रकाशन

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

दिवसेंदिवस वेगवेगळे आजार डोके वर काढत असून त्यावर मात करण्यासाठी आध्यात्मिक शांतीसोबत शारिरीक, मानसिक स्वास्थ आवश्यक असून तीच सुखी जीवनाची गुरुकिल्ली असल्याचे प्रतिपादन महामंडलेश्वर जनार्दन हरिजी महाराज यांनी केले. दै. लोकशाहीच्या 'लोकारोग्य' या दिवाळी अंकाच्या प्रकाशन प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर खासदार स्मिता वाघ, आमदार राजूमामा भोळे, भाजपाच्या जिल्हा सरचिटणीस डॉ. केतकी पाटील, आनंद हॉस्पीटलचे संचालक डॉ. अमित भंगाळे, जिल्हा माहिती अधिकारी रवींद्र ठाकूर, लोकशाहीचे संचालक राजेश यावलकर, शुभांगी यावलकर, सल्लागार संपादक धों.ज.गुरव, वरिष्ठ उपसंपादक दीपक कुलकर्णी उपस्थित होते. प्रास्ताविक राजेश यावलकर यांनी तर अंकाची माहिती धों.ज.गुरव यांनी दिली.

महामंडलेश्वर जनार्दन हरिजी महाराज म्हणाले की, लोकशाहीचा हा विशेषांक म्हणजे आरोग्यासाठी मल्टीस्पेशालीस्ट आहे. निरोगी आरोग्यासाठी अंकाचे वाचन करणे गरजेचे आहे. जो अंक वाचेल तो नक्कीच 'वाचेल' असे सांगत त्यांनी अंकाचे तोंड भरुन कौतुक केले. जीवनात स्वास्थ महत्वाचे आहे. निरोगी आयुष्य जगण्याला महत्व आहे, नको त्या बाबींना जास्त महत्व देवू नका, धार्मिक, आध्यात्मिक क्षेत्रांची आरोग्याच्या बाबतीत पुढे येवून समाजाची सेवा करावी असे आवाहन केले.

यावेळी खासदार स्मिता वाघ, आमदार राजूमामा भोळे, भाजपाच्या जिल्हा सरचिटणीस डॉ. केतकी पाटील, आनंद हॉस्पीटलचे संचालक डॉ. अमित भंगाळे, जिल्हा माहिती अधिकारी रवींद्र ठाकूर, कवी आर. डी. कोळी यांनी मनोगत व्यक्त केले. या सोहळ्याला जाहिरात व्यवस्थापक विवेक कुलकर्णी, सुरेश सानप, मुबारक तडवी, ललित कोळी, मोहन पाटील, भूषण परदेशी, गौरव पाटील, संजय सुतार, पंकज गवळी, कवी आर.डी. कोळी, गोविंद पाटील, निंबा बडगुजर उपस्थित होते. आभार दीपक कुलकर्णी यांनी मानले.

## दीपक केसरकरांचा जबाब नोंदवणार!

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई** प्रतिनिधी



रोहित आर्या एन्काऊंटर प्रकरणात एक मोठी माहिती समोर येत आहे. त्याने मुंबईतील पवई येथील आरए स्टुडिओत १७ मुलांना ओलीस ठेवले होते. सोबतच मुलांना ओलीस ठेवून त्याने मला काहीतरी बोलायचे आहे, काहीतरी सांगायचे आहे? असा संदेश देणार एक व्हिडीओ शेअर केला होता. ओलीस ठेवलेल्या मुलांची सुटका करताना पोलिसांनी केलेल्या गोळीबारात त्याचा मृत्यू झाला होता. आता याच प्रकरणात आता मोठी माहिती समोर येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार पोलिसांनी माजी मंत्री दीपक केसरकर यांना फोन केला आहे. लवकरच केसरकर यांचा जबाब नोंदवला जाणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार मुंबई पोलिसांची गुन्हे शाखा लवकरच दीपक केसरकर यांचा जबाब नोंदवणार आहे. रोहित आर्याने जेव्हा मुलांना ओलीस ठेवले होते. तेव्हा पोलिसांनी दीपक केसरकर

पान २ वर »

## इलेक्ट्रिक दुचाकीच्या चार्जरचा झटका : बालकाचा मृत्यू

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पारोळा** प्रतिनिधी



शहरातील ओम नगर भागातील रहिवासी शुभम राठोड यांचा भाचा व बहिण हे यांच्याकडे दिवाळीसाठी आले असता विश्वा चौधरी हा दीड वर्षे वय असलेल्या बालकाचा इलेक्ट्रिक दुचाकी चार्जरचा शॉक लागल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. ही घटना रविवारी सायंकाळच्या सुमारास घडली विश्वा सुरज चौधरी असे या मृत बालकाचे नाव असुन तो शुभांगी सुरज चौधरी रा. मालेगाव यांच्या मुलगा होता हे दिवाळी निमित्त पारोळ्यातील ओम नगर येथे आपल्या मामाकडे आले होते. मृत बालक विश्वा व त्याची आई ह्या आपल्या वडिलांकडे दोन मुलांसह माहेरी आल्या होत्या. त्यापैकी लहान मुलगा विश्वा हा अंगणातील पोर्चमध्ये खेळत असताना त्या ठिकाणी इलेक्ट्रिक स्कूटीचे चार्जर पडलेले होते. ते चार्जर त्याने तोंडात घातल्याने त्याला शॉक लागून

पान २ वर »

# खडसेंच्या घरी चोरी करणारे आरोपी अटकेत

### मौल्यवान मुद्देमाल मिळाला मात्र सीडीचे गूढ कायम

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

काही दिवसांपूर्वी माजी मंत्री तथा विधानपरिषदेचे आमदार एकनाथ खडसे यांच्या जळगाव येथील घरात चोरी झाली. चोरांनी घरातील मौल्यवान वस्तू, पैसे आणि सीडी चोरल्या होत्या. या प्रकरणातील आरोपींना पकडण्यात पोलिसांना यश आले आहे. पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली आहे. तसेच चोरलेले मौल्यवान दागिने देखील पोलिसांना सापडले आहेत. एकनाथ खडसे यांच्या घरी झालेल्या चोरीप्रकरणी दोघांना अटक करण्यात आली आहे. जळगाव येथे घरफोडी केल्यानंतर आरोपींनी उल्हासनगर येथे चिराग सय्यद या व्यक्तीकडे मुद्देमाल सोपवला होता. तसेच चिराग सय्यद याने हा मुद्देमाल कैलास खंडेलवाल नामक सराफ व्यवसायाकडे दिला होता. या दोघांनाही अटक करण्यात आली आहे. मात्र, प्रत्यक्ष घरफोडी करणारे तीन आरोपी अद्याप पोलिसांच्या हाती लागलेले नाहीत. एजाज अहमद, मोहम्मद बिलाल, बाबा अशी या मुख्य आरोपींची नावे आहेत. हे तिघेही सराईत गुन्हेगार असल्याची माहिती पोलीस अधीक्षकांनी दिली. एकनाथ

पान २ वर »

## 'खाष्ट सासू' दया डोंगरेंचे निधन

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई** प्रतिनिधी



मराठी मनोरंजन विश्वातून दु:खद बातमी समोर येत आहे. ज्येष्ठ अभिनेत्री दया डोंगरे यांचं वयाच्या ८५ व्या वर्षी निधन झालं आहे. त्यांच्या मृत्यूनंतर कलाविश्वात शोककळा पसरली असून, अनेक कलाकार आणि चाहत्यांनी सोशल मीडियावर श्रद्धांजली वाहिली आहे. त्यांच्या भूमिकांनी मराठी सिनेमात एक वेगळी ओळख निर्माण केली होती. १९४० साली पुण्यात जन्मलेल्या दया डोंगरे यांना कलेचा वारसा पिढ्यान्पिढ्या चालत आला होता. त्यांच्या आई यमुनाबाई मोडक या प्रसिद्ध नाट्यअभिनेत्री होत्या, तर आत्या शांताबाई मोडक गायिका

पान २ वर »

## गरीब कल्याण अन्न योजनेला मुदतवाढ

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**नवी दिल्ली** प्रतिनिधी

केंद्र सरकारने देशाच्या कोट्यवधी गरीब आणि कमजोर वर्गांसाठी मोठी भेट देण्याचा निर्णय घेतला आहे. प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेला (पीएमजीकेएवाय) पुढच्या पाच वर्षांसाठी मुदतवाढ दिलेली आहे. आता या योजनेंतर्गत ८१.३५ कोटी लाभार्थ्यांना डिसेंबर २०२८ पर्यंत मोफत अन्न मिळणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कॅबिनेट बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेचा उद्देश देशातील कोणताही गरीब उपाशी राहणार नाही याची काळजी घेतली जाते. ही केंद्र सरकारची सर्वात मोठी खाद्य सुरक्षा योजना आहे. ज्याची सुरुवात कोरोना साथीच्या वेळी मार्च २०२० रोजी झाली होती. याचा उद्देश्य लॉकडाऊन आणि आर्थिक संकटात गरीब आणि मजूरांना पुरेसे अन्न मिळावे यासाठी केली होती. सुरुवातीला काही महिन्यांसाठीच ही योजना राबवण्यात आली होती. नंतर याची गरज पाहून या योजनेला वेळोवेळी मुदतवाढ दिली आहे. या योजनेंतर्गत लाभार्थ्यांनी केवळ मोफत अन्न नाही तर अनेक फायदेही मिळतात. मोफत अन्न : या योजनेचा सर्वात मोठा आणि मुख्य लाभ आहे. प्रायोरिटी हाऊसहोल्ड रेशन कार्ड धारकांना दर महिन्याला

पान २ वर »



## भक्तिमय वातावरणात विठ्ठल-रुक्मिणी महापूजा

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**चाळीसगाव** प्रतिनिधी

दहिवद ता. चाळीसगाव येथे कार्तिकी एकादशी निमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात भक्तिमय वातावरणात काकड आरती व महापूजा संपन्न झाली. या पूजेचा मान श्री. भाऊसाहेब रामभाऊ वाघ (माध्यमिक शिक्षक) व सौ. वंदना भाऊसाहेब वाघ या

पान २ वर »

# चाळीसगाव शहराला विकासाच्या नव्या उंचीवर नेण्यासाठी कटिबद्ध

### सुवर्णा स्मृती उद्यान लोकार्पण व सुधारित पाणीपुरवठा योजनेच्या भूमिपूजन प्रसंगी आ.मंगेश चव्हाण यांचे प्रतिपादन

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**चाळीसगाव** प्रतिनिधी

कार्तिकी एकादशीच्या शुभमुहूर्तावर रविवारी सायंकाळी दिव्यांच्या रोषनाईत, फटाक्यांच्या आतषबाजीत न्हाऊन निघालेल्या अल्हाददायक वातावरणात चाळीसगाव शहरात आमदार मंगेशदादा चव्हाण यांच्या संकल्पनेतून साकारण्यात आलेल्या सुवर्णा स्मृती उद्यानाचे लोकार्पण तर शहरासाठी पुढील ३० वर्षाचे नियोजन लक्षात घेऊन १४२ कोटी रुपये खर्चाच्या मंजूर झालेल्या पाणीपुरवठा योजनेचे भूमीपुजन आमदार मंगेश चव्हाण यांच्याहस्ते व विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या संपन्न झाले, यावेळी स्केटींग खेळणा-या मुलांच्या हस्ते उद्यानात साकारलेल्या स्केटिंग ग्राउंडचे उद्घाटन देखील करण्यात आले. नुकतेच केबीसी मध्ये सहभागी होत चाळीसगावचे नाव बिग बी



अमिताभजी यांच्या ओठी आणणारी कु. श्रद्धा किशोर कापुरे हिचा व तिच्या आईवडिलांचा आमदार चव्हाण व शिवनेरी फाउंडेशनच्या अध्यक्षा सौ. प्रतिभाताई चव्हाण यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ.सुनील राजपूत, डॉ. विनोद कोतकर, मार्केट सभापती प्रदीप पाटील, उपसभापती शैलेंद्र पाटील, पोपट भोळे, मच्छिंद्र राठोड, बाबूलाल पवार गुरुजी, रवींद्र पाटील, योगेश अग्रवाल, देवयानीताई ठाकरे, सुरेश स्वार, धर्मराज वाघ, राजेंद्र चौधरी, के.बी. साळुंखे, प्रितमदास रावलानी, वसंत चंद्रात्रे, शेषराव पाटील, कपील पाटील, राजेंद्र राठोड, दिनेश माळी, प्रदीप देवरे, डॉ.महेंद्र राठोड, विष्णू चकोर, प्रा. सुनील निकम, नमोताई राठोड, संगीता गवळी, अलकनंदा भवर, राष्ट्रवादीचे भाऊसाहेब पाटील, भूषण पाटील, सुभाष पाटील, नवल पवार, साहेबराव राठोड, धर्मराज अहिरराव यांच्यासह आजी माजी लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आदि उपस्थित

पान २ वर »